महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र ०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जावक क्रमांक : तंशिविकापु/विवि/महाडीबीटी २०२०-२१/२०२१/ 1464 दिनांक : १८.०३.२०२१

18 MAR 2021

**महत्वाचे परिपत्रक**

प्रति,
संचालक/प्राचार्य,
तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील
सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित / खाजगी विनाअनुदानित संस्था
पुणे विभाग.

विषय : शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील महाडीबीटी पोर्टलवरील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणा-या शिष्यवृत्ती योजनांच्या कार्यवाहीबाबत..

संदर्भ : १) तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी/२०२०-२१/२०२०/३७७ दि ०३.१२.२०२०.
२) या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. तंशिविकापु/विवि/महाडीबीटी२०२०-२१/२०२०/४८ दि ०५.०१.२०२१.
३) तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/२०२०-२१/विकाप/२०२१/१३ दि १३.०१.२१.
४) या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. तंशिविकापु/विवि/महाडीबीटी२०२०-२१/२०२०/२३३ दि. १४.०१.२०२१.
५) तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/२०२०-२१/विकाप/२०२१/४६ दि ११.०२.२१.
६) या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. तंशिविकापु/विवि/महाडीबीटी२०२०-२१/२०२१/७६१ दि. ११.०२.२०२१.
७) या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. तंशिविकापु/विवि/महाडीबीटी२०२०-२१/२०२१/११९८ दि. ०३.०३.२०२१.
८) तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२१/७८ दि ०४.०३.२१.
९) या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. तंशिविकापु/विवि/महाडीबीटी२०२०-२१/२०२१/१२६२ दि. ०६.०३.२०२१.
१०) तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२१/१०४ दि १७.०३.२१.

उपरोक्त विषयास अनुसरुन, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता, महाडीबीटी पोर्टल दिनांक ०३.१२.२०२० पासून शासनाकडून सुरु करण्यात आलेले आहे. संदर्भ क्रमांक २, ४, ६, ७ व ९ मधील परिपत्रकान्वये या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व संस्थांना, महाडीबीटी पोर्टलवरील योजनांच्या लाभासाठी लवकरात लवकर विद्यार्थ्यांकडून अर्ज भरुन घेऊन संस्थांच्या लॉगीनमध्ये प्राप्त होणारे शिष्यवृत्ती योजनांचे ऑनलाईन अर्ज प्रलंबित न ठेवता योजनेच्या अटी व शर्तीनुसार तपासणी करुन पुढे पाठवण्याबाबत आवश्यक सूचना देण्यात आलेल्या आहेत.

या परिपत्रकाद्वारे सर्व संस्थांना पुनःश्च सुचित करण्यात येते की, महाडीबीटी पोर्टलवरील सोबत जोडलेल्या तक्त्यानुसार शिष्यवृत्ती योजनेचे अर्ज भरुन घेण्याची अंतिम तारीख ३१ मार्च २०२१ ही आहे. तरी सर्व संस्थांनी पात्र विद्यार्थ्यांकडून **दिनांक २२.०३.२०२१ पूर्वी** अर्ज भरुन घेऊन तसेच संस्थेच्या लॉगीनमध्ये प्राप्त होणारे ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज अंतिम तारखेपर्यंत प्रलंबित न ठेवता योजनेच्या अटी व शर्तीनुसार तपासणी करुन **दिनांक २३.०३.२०२१ पूर्वी** निकाली काढावेत.

**शिष्यवृत्ती अर्ज मुदतीच्या आत संस्थांनी सर्व पात्र विद्यार्थ्यांकडून भरुन घ्यावेत. शिष्यवृत्ती योजनेपासून पात्र विद्यार्थी वंचित राहिल्यास तसेच त्या कारणाने आपल्या महाविद्यालयास शिष्यवृत्तीची रक्कम न मिळाल्यास याची सर्व जबाबदार संस्था प्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी.**

**तसेच विद्यार्थ्याने आधार बेस्ड व नॉन आधार बेस्ड असे दोन्ही प्रकारचे अर्ज ऑनलाईनरित्या भरुन अंतिम केले असल्यास, संस्थेने संस्थास्तरावरुन नॉन आधार बेस्ड अर्ज रद्द करावा. संस्था स्तरावरुन विद्यार्थ्याने भरलेले दोन्ही प्रकारचे अर्ज ऑनलाईनरित्या पुढील कार्यवाहीसाठी पाठविल्यास याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्था प्राचार्यांची राहिल याची नोंद घ्यावी.**

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

सोबत : महाडीबीटी पोर्टलवरील तारखेचा तक्ता.

प्रत : प्रोग्रॅमर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शीत करणेसाठी.

Deccan Education Society's

# *Technical Institute*

(Estd. 1937)

P.B. No. 816, BMCC Road, Pune 411 004.
Telephone : 020 – 67656193/92 E-Mail : principal@destip.org Website : www.destip.org
*Diploma in Surface Coating Technology*
*Advance Diploma in Industrial Safety*

जा.क्र. ३८० / २०२० –२१ दि. १९ / ०३ / २०२१

अत्यंत महत्वाचे / कालमर्यादित संदर्भ : तंशिविकापु / विवि / महाडीबीटी २०२०-२१ / २०२१/१४६४ दि. १८/३/२०२१

## शिष्यवृत्ती विभाग नोटिस
## शैक्षणिक वर्ष २०२० – २१

डिप्लोमा इन सर्फेस कोटिंग टेक्नोलॉजी या अभ्यासक्रमास शिकत असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की त्यांनी त्यांच्या प्रवर्ग निहाय स्कॉलशिपचे / फ्रीशिपचे ऑनलाईन अर्ज दि. **२२ / ०३ / २०२१ पूर्वी** **https://mahadbtmahait.gov.in** या संकेतस्थळावर सादर करावेत. विद्यार्थ्यांनी आपल्या प्रवर्ग निहाय अर्ज सादर करावेत. अर्ज सादर करताना सर्व मूळ कागदपत्रांच्या स्कॅन प्रती / फोटो अपलोड कराव्यात. अर्ज परीपूर्ण व सर्व कागदपत्र वाचणीय स्वरूपात असावीत. अपूर्ण / अवाचणीय अर्ज पूढे पाठवले जाणार नाहीत. वेळेत व योग्य पध्दतीने अर्ज सादर न केल्यास अथवा स्कॉलरशिप साठी अपात्र ठरल्यास विद्यार्थ्यास शैक्षणिक फी संस्थेकडे जमा करावी लागेल. याची नोंद घ्यावी.

३. प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांनी महाडिबीटी वरील पूर्वीचाच लॉगीन आयडी व पासवर्ड वापरावा.

४. व्दितीय व तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांनी अर्ज नूतनीकरण करावेत आणि आवश्यक कागदपत्र अपलोड करावीत व माहिती अद्ययावत करावी.

४. सर्व विद्यार्थ्यांचे केवळ आधार बेस अर्जच स्वीकारले जातील नॉन आधार अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

19 MAR 2021

D. E. SOCIETY'S TECHNICAL INSTITUTE PUNE 411 004

**Head**
**D. E. Society's Technical Institute**
**B.M.C.C. Road, Pune-411 004**